## MAHARASHTRA ACT No. XV OF 1988.

## THE MAHARASHTRA REGULATION OF USE OF PRE-NATAL DIAGNOSTIC TECHNIQUES ACT, 1988

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक २२ एप्रिल १९८८ रोजी मिळाली असल्यामुळे ती, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XV OF 1988.

AN ACT TO PROVIDE FOR THE REGULATION OF THE USE OF MEDICAL OR SCIENTIFIC TECHNIQUES OF PRE-NATAL DIAGNOSIS SOLELY FOR THE PURPOSE OF DETECTING GENETIC OR METABOLIC DISORDERS OR CHROMOSOMAL ABNORMALITIES OR CERTAIN CONGENITAL ANOMALIES OR SEX-LINKED DISORDERS AND OR PREVENTION OF THE MISUSE OF THESE TECHNIQUES FOR THE PURPOSE OF PRE-NATAL SEX DETERMINATION LEADING TO FEMALE FOETICIDE AND FOR MATTERS CONNECTED THERE-WITH OR INCIDENTAL THERETO.

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राज्यपत्रात" दिनांक २८ एप्रिल १९८८ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

## सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.

**प्रसवपूर्व निदान करण्यासंबंधीची वैद्यकीय किंवा वैज्ञानिक तंत्रे जननविकृती किंवा चयापचय किंवा लिंगगुणसूत्रविषयक दोष किंवा विवक्षित जन्मजात विसंगती किंवा लिंगसंलग्न विकृती शोधून काढण्याच्या प्रयोजनाकरिताच केवळ वापरण्यात यावीत यादृष्टीने त्यांचे विनियमन करण्याची व स्त्रीलिंगी गर्भ-हत्येमध्ये ज्याची परिणती होते अशा रीतीने प्रसवपूर्व लिंगनिर्धारण करण्याच्या प्रयोजनार्थ या तंत्राचा दुरुपयोग करण्याच्या प्रवृत्तीस प्रतिबंध करण्याची, तसेच त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** गर्भजल चाचणी किंवा प्रसवपूर्व गर्भनिदान करण्याच्या अन्य कोणत्याही विद्यमान वा भविष्यकालीन कार्यपद्धतीचा जननविकृती किंवा चयापचय किंवा लिंगगुणसूत्रविषयक दोष किंवा विवक्षित जन्मजात विसंगति किंवा लिंगसंलग्न विकृती शोधून काढण्याच्या प्रयोजनाकरिताच केवळ वापर करण्यात यावा याकरिता त्यांचे विनियमन करणे व स्त्रीलिंगी गर्भहत्येमध्ये ज्याची

परिणती होते अशा रीतीने प्रसवपूर्व लिंगनिर्धारण करण्याकरिता अशा तंत्रांचा दुरुपयोग करण्यास प्रतिबंध करणे आणि त्यासंबंधीच्या किंवा त्याच्याशी आनुषंगिक असलेल्या बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणचाळीसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, 'महाराष्ट्र प्रसवपूर्व निदानतंत्रांच्या वापराचे विनियमन करण्याबाबत अधिनियम, १९८८' असे म्हणता येईल.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकाला अंमलात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "जाहिरात" याचा अर्थ लावण्यात आलेली एखादी सूचना, परिपत्रक, लेबल, आवेष्टन, मुद्रित मजकूर किंवा इतर दस्तऐवज असा असून त्यामध्ये प्रकाश, ध्वनि, धूर, वायु, चलचित्रपट किंवा व्हिडिओ फीत (टेप) यांच्या सहाय्याने केलेली कोणतीही घोषणा किंवा दृश्य स्वरुपातील प्रदर्शन यांचा समावेश होतो;

(ब) "समुचित प्राधिकरण" याचा अर्थ, राज्य शासनाने कलम ६ अन्वये स्थापन केलेले राज्य समुचित प्राधिकरण;

(क) "प्रजनन चिकित्सालय" किंवा "चिकित्सालय" याचा अर्थ, प्रजनन सल्ला केंद्र तसेच प्रजनन प्रयोगशाळा यांची कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ या अधिनियमान्वये नोंदणी करण्यात आलेली जागा;

(ड) "प्रजनन सल्ला केंद्र" किंवा "केंद्र" याचा अर्थ, रुग्णांना प्रजननविषयक सल्ला देण्यासाठी आणि गर्भस्पंदन परीक्षा करणे व प्रजनन चिकित्सालयाकडे किंवा प्रयोगशाळेकडे प्रसवपूर्व निदान चाचणीसाठी पाठविण्याकरिता गर्भवती स्त्रीच्या गर्भजलाचे, जरायु उद्वर्धाचे (Chorionic Villi) किंवा रक्त किंवा कोणत्याही स्नायूतंतूंचे नमुने घेणे यांसारखी प्रसूतिशास्त्रीय व स्त्रीरोगशास्त्रीय कामे पार पाडण्यासाठी असलेली संस्था, रुग्णालय, शुश्रूषागृह किंवा या अधिनियमान्वये नोंदणी करण्यात आलेली कोणत्याही नावाने ओळखण्यात येणारी कोणतीही जागा;

(ई) "प्रजनन प्रयोगशाळा" किंवा "प्रयोगशाळा" याचा अर्थ, ज्या जागेत प्रजनन सल्ला केंद्रांकडून प्रसवपूर्व निदान चाचणीसाठी आलेल्या नमुन्यांचे विश्लेषण किंवा चांचण्या करण्याची सुविधा पुरविण्यात येते अशी या अधिनियमान्वये प्रजनन प्रयोगशाळा म्हणून नोंदणी करण्यात आलेली जागा;

(फ) "स्त्रीरोगतज्ज्ञ" याचा अर्थ, जिने एम. बी. बी. एस. ची पदवी मिळविल्यानंतर स्त्रीरोगशास्त्र या विषयातील पदव्युत्तर अर्हता प्राप्त केली आहे अशी व्यक्ती;

(ग) "स्थानिक दक्षता समिती" याचा अर्थ, कलम १६ अन्वये नियुक्त करण्यात आलेली समिती;

(ह) "वैद्यकीय प्रजननशास्त्रज्ञ" याचा अर्थ जिने प्रसवपूर्व निदान तंत्रांच्या क्षेत्रात वैद्यकीय प्रजननशास्त्र या विषयातील पदवी किंवा पदविका किंवा प्रमाणपत्र मिळविले आहे किंवा जिला,—

(एक) एम.बी.बी.एस्. किंवा इतर कोणतीही तत्सम पदवी;

(दोन) जीवशास्त्र या विषयातील एम. एससी. किंवा पी. एच. डी. किंवा इतर कोणतीही तत्सम पदवी;

यांपैकी कोणतीही पदवी प्राप्त केल्यानंतर त्या क्षेत्रात काम करण्याचा किमान दोन वर्षांचा अनुभव आहे, अशी व्यक्ती;

(आय) "प्रसवपूर्व निदान पद्धती" याचा अर्थ, गर्भस्पंदन परीक्षा करणे किंवा प्रसवपूर्व निदान चाचणीसाठी प्रजनन चिकित्सालयांकडे किंवा प्रयोगशाळेकडे पाठविण्यासाठी गर्भवती स्त्रीच्या शरीरातील गर्भजलाचा, जरायु उद्वर्धाचा (Chorionic villi), रक्ताचा किंवा कोणत्याही स्नायुतंतूंचा नमुना घेणे किंवा तो काढून घेणे यांसारखी सर्व स्त्रीरोगशास्त्रीय किंवा प्रसूतिशास्त्रीय किंवा वैद्यकीय कामे;

(ज) "प्रसवपूर्व निदान तंत्र" या शब्दप्रयोगात, सर्व प्रकारच्या प्रसवपूर्व निदान पद्धतींचा व प्रसवपूर्व निदान चाचण्यांचा समावेश होतो;

(के) "प्रसवपूर्व निदान चाचणी" याचा अर्थ, जन्मानंतर होणाऱ्या संभाव्य जननविषयक किंवा चयापचयविषयक विकृती किंवा लिंगगुणसूत्रविषयक दोष किंवा काही विवक्षित जन्मजात विसंगती किंवा हेमोग्लोबिनसंबंधीच्या विकृती किंवा लिंगसंलग्न विकृती शोधून काढण्यासाठी गर्भवती स्त्रीचे गर्भजल, जरायु उद्वर्ध (Chorionic villi), रक्त किंवा कोणताही स्नायुतंतू यांची प्रजनन चिकित्सालयात किंवा प्रयोगशाळेत केलेली कोणतीही चाचणी किंवा विश्लेषण;

(ल) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित;

(म) "नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी" याचा अर्थ, भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ याचे कलम (२), खंड (ह) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणतीही मान्यताप्राप्त वैद्यकीय अर्हता असणारा व ज्याचे नाव महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियम, १९६५ अन्वये तयार करण्यात आलेल्या किंवा तयार करण्यात आल्याचे मानण्यात आलेल्या ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत दाखल करण्यात आले आहे असा वैद्यक व्यवसायी;

१९५६ चा १०२. १९६५ चा महाराष्ट्र ४६.

(न) "राज्य दक्षता समिती" याचा अर्थ, राज्य शासनाने कलम १३ अन्वये नियुक्त केलेली समिती;

(ओ) "स्वयंसेवी संघटना" याचा अर्थ, सार्वजनिक आरोग्य किंवा महिला कल्याण किंवा मानवी हक्क यासंबंधीच्या क्षेत्रात कार्य करणारी कोणतीही स्वयंसेवी संघटना;

## प्रकरण दोन

### केंद्र, प्रयोगशाळा, चिकित्सालय आणि प्रसवपूर्व निदान पद्धती आणि तंत्रे यांचे विनियमन

केंद्रे व चिकित्सालये यांचे विनियमन.

३. (१) कोणतेही प्रजनन केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय, किंवा ठिकाण यांना, या अधिनियमान्वये त्यांची नोंदणी करण्यात आली असल्याखेरीज, गर्भजलचाचणी, जरायुउद्वर्ध-चाचणी (Chorionic Villi Sampling) किंवा इतर कोणतेही प्रसवपूर्व निदान तंत्र यांसारख्या पद्धतींच्या सहाय्याने प्रसवपूर्व निदान तंत्राशी संबंधित चाचण्या करता येणार नाहीत किंवा त्या चाचण्या करण्यात सहभागी होता येणार नाही किंवा त्या चाचण्या करण्यात मदत करता येणार नाही.

(२) कोणतेही नोंदणी केलेले केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय यांना, विहित अर्हता प्राप्त न केलेल्या व्यक्तींची तसेच स्त्रीरोगतज्ञांची मानधनावर किंवा वेतनावर नियुक्ती करता येणार नाही किंवा त्यांची सेवा घेता येणार नाही.

(३) कोणताही वैद्यकीय प्रजननशास्त्रज्ञ किंवा स्त्रीरोगतज्ञ किंवा वैद्यकव्यवसायी किंवा कोणतीही व्यक्ती यांना स्वतःला किंवा त्यांचे सहायक, एजंट अथवा सहकारी यांच्यामार्फत, या अधिनियमान्वये नोंदणी करण्यात आलेले प्रजनन सल्ला केंद्र, प्रजनन केंद्र किंवा प्रजनन प्रयोगशाळा यांव्यतिरिक्त इतर ठिकाणी कोणतीही प्रसवपूर्व निदान तंत्र चाचणी करता येणार नाही किंवा करण्यात मदत करता येणार नाही किंवा करण्याची व्यवस्था करता येणार नाही.

प्रसवपूर्व निदान पद्धती व तंत्रे यांचे विनियमन.

४. (१) पोट-कलमे (२) आणि (३) मध्ये निर्दिष्ट केलेली प्रयोजने खेरीजकरून कोणत्याही कारणासाठी प्रजननविषयक विकृतीच्या प्रसवपूर्व निदानासाठी नोंदणी केलेले कोणतेही प्रजनन सल्ला केंद्र किंवा प्रजनन चिकित्सालय किंवा प्रजनन प्रयोगशाळा यांसह कोणत्याही ठिकाणाचा वापर करता येणार नाही आणि कोणत्याही व्यक्तीला अशा इतर कारणांसाठी प्रसवपूर्व निदान तंत्रांचा वापर करता येणार नाही अथवा करण्याची व्यवस्था करता येणार नाही.

(२) प्रसवपूर्व निदान तंत्राचा वापर करण्यासंबंधातील अर्हता प्राप्त केलेल्या व्यक्तीची, प्रत्येक रुग्णप्रकरणाच्या बाबतीत, पुढीलपैकी एक किंवा अधिक शर्ती पूर्ण करण्यात आल्या असल्याबाबत, खात्री पटली असल्याखेरीज, कोणत्याही प्रसवपूर्व निदानतंत्राचा वापर करता येणार नाही किंवा वापर करण्याची व्यवस्था करता येणार नाही :—

(एक) गर्भवती स्त्रीचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक असावे;

(दोन) दोन किंवा अधिक गर्भपात किंवा गर्भहानी यांचे पूर्ववृत्त;

(तीन) औषधिद्रव्ये, किरणोत्सर्ग, संसर्ग किंवा विघातक रासायनिक द्रव्ये यांच्या संसर्गाचे पूर्ववृत्त;

(चार) मतिमंदता किंवा अपंग (Spastic) वा मूकबधिर मूल यांसारखी शारीरिक विद्रूपता किंवा इतर कोणताही प्रजननसंबंधी रोग यांची कौटुंबिक पार्श्वभूमी;

(पाच) समुचित प्राधिकरणाकडून मान्य करण्यात येईल अशी इतर कोणतीही अट.

(३) केवळ पुढीलपैकी कोणत्याही एका किंवा अधिक विसंगतींचे निदान करण्याच्या प्रयोजनासाठीच या अधिनियमाखालील प्रसवपूर्व निदान तंत्राचा वापर करता येईल :—

(एक) लिंगगुणसूत्रीय विसंगती;

(दोन) प्रजनन चयापचय दोष;

(तीन) हेमोग्लोबिनसंबंधी विकृती;

(चार) लिंगसंलग्न जननविकृती;

(पाच) जन्मजात विसंगती;

(सहा) या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी समुचित प्राधिकरणाकडून घोषित करण्यात येतील अशा इतर कोणत्याही विसंगती किंवा रोग.

(४) प्रसवपूर्व निदानपद्धतींचा अवलंब करण्यापूर्वी, असे करण्यासंबंधातील अर्हता प्राप्त केलेली व्यक्ती, अशा पद्धतीच्या सर्व आनुषंगिक व पश्चात परिणामांची स्त्रीरुग्णाला स्पष्ट कल्पना दिल्यानंतर, विहित नमुन्यात त्या स्त्री रुग्णाची लेखी संमती मिळवील.

काही विवक्षित प्रयोजनांसाठी, प्रसवपूर्व निदान-तंत्रांना बंदी घालणे.

५. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस व त्या तारखेपासून,—

(१) कोणतेही प्रजनन सल्ला केंद्र, प्रयोगशाळा, चिकित्सालय, स्त्रीरोगतज्ञ, वैद्यकव्यवसायी किंवा इतर कोणतीही व्यक्ती, स्त्रीलिंगी गर्भहत्येचा हेतू असला किंवा नसला तरीही केवळ गर्भाचे लिंग ठरविण्याच्या प्रयोजनासाठी अल्ट्रासोनोग्राफीचा समावेश करून, प्रसवपूर्व निदान तंत्राचा वापर करणार नाही किंवा वापर करण्यास अनुमती देणार नाही ;

(२) कोणतेही केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय ही, त्या केंद्रात, चिकित्सालयात किंवा प्रयोगशाळेत उपलब्ध असलेल्या प्रसवपूर्व लिंगनिदानाच्या सुविधांची कोणत्याही प्रकारे जाहीरात करणार नाही.

(३) कोणतीही व्यक्ती किंवा गर्भवती स्त्रीचे कुटुंबीय कलम ४ च्या पोट-कलम (३) मध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रयोजनांव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी प्रसवपूर्व निदान तंत्राचा वापर करवून घेण्याचा प्रयत्न करणार नाहीत.

## प्रकरण तीन

### राज्य समुचित प्राधिकरण

राज्य समुचित प्राधिकरणाची स्थापना.

६. (१) या अधिनियमाच्या प्रारंभी किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे एका राज्य समुचित प्राधिकरणाची स्थापना करील, व त्यामध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) आरोग्य सेवा संचालक—पदसिद्ध अध्यक्ष;

(दोन) सह संचालक, आरोग्य सेवा— पदसिद्ध सचिव;

(तीन) स्वयंसेवी संघटनांचे दोन प्रतिनिधी;

(चार) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, किंवा उपसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला त्याचा प्रतिनिधी;

(पाच) स्त्रीरोग तज्ज्ञ;

(सहा) वैद्यकीय प्रजनन शास्त्रज्ञ;

(सात) भारतीय वैद्यक संशोधन परिषदेचा एक प्रतिनिधी.

खंड (दोन), (तीन), (पाच), (सहा) आणि (सात) यामध्ये निर्दिष्ट केलेले सदस्य राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येतील.

(२) समुचित प्राधिकरण, त्यास आवश्यक वाटेल तेव्हा, आपल्या बैठकीला संबंधित स्थानिक क्षेत्रातील जिल्हा शल्यचिकित्सक किंवा मुख्य वैद्यकीय अधिकारी यांना आमंत्रित सदस्य म्हणून आमंत्रित करू शकेल.

प्राधिकरणाच्या बैठकी.

७. (१) आवश्यक असेल त्याप्रमाणे व आवश्यक असेल तेव्हा समुचित प्राधिकरणाच्या बैठकी घेण्यात येतील; मात्र वर्षातून किमान दोनदा समितीची बैठक घेण्यात येईल. समुचित प्राधिकरणास, आपले कामकाज चालविण्याकरिता नियम तयार करता येतील.

(२) समुचित प्राधिकरणाच्या बैठकीमधील, सर्व निर्णय, बैठकीला उपस्थित असणाऱ्या सदस्यांच्या साध्या बहुमताने घेण्यात येतील व बैठकीची गणपूर्ती होण्यास पाच सदस्यांची आवश्यकता असेल व त्यामध्ये अध्यक्षाचा समावेश असेल. एखाद्या सदस्याचे पद रिक्त आहे किंवा एखादा सदस्य अनुपस्थित आहे एवढ्याच केवळ कारणावरून प्राधिकरणाचे निर्णय निष्फळ किंवा विधिअग्राह्य ठरवले जाणार नाहीत.

(३) मृत्यू, राजीनामा किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे रिक्त होणारे प्राधिकरणाच्या सदस्याचे कोणतेही पद, राज्य शासन त्वरित भरील व अशा प्रकारे रिक्त पद भरण्यात येईतोपर्यंत जणू काही असे कोणतेही पद रिक्त नसल्याप्रमाणे उरलेले सदस्य कार्य करण्याचे चालू ठेवतील.

(४) अशासकीय सदस्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती तसेच पदावधी हा राज्य शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

प्राधिकरणाची कामे.

८. (१) समुचित प्राधिकरणाची कामे पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) प्रसवपूर्व निदानतंत्रांच्या वापरासंबंधातील धोरणविषयक बाबींवर शासनाला सल्ला देणे;

(दोन) विज्ञानातील प्रगती, नवीन कार्यपद्धती व तंत्रांचा शोध या गोष्टी नजरेसमोर ठेवून आणि अधिनियमाची अंमलबजावणी करताना आलेला अनुभव जमेस धरून अधिनियमान्वये विहित केलेल्या नियमात आवश्यक ते बदल करण्याविषयी शासनाला शिफारस करणे;

(तीन) केंद्रांची, प्रयोगशाळांची व चिकित्सालयांची नोंदणी करून घेण्यासाठी, कलम ९ अन्वये व त्या नोंदणीचे नवीकरण करण्यासाठी कलम १० अन्वये करण्यात आलेले अर्ज विचारात घेणे;

(चार) अधिनियमाच्या व नियमांच्या तरतुदींचा भंग झाल्याच्या तक्रारी विचारात घेणे आणि कलम ११ अन्वये निलंबनाची किंवा नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही करणे;

(पाच) नोंदणीकृत केंद्रे, प्रयोगशाळा व चिकित्सालये यांनी राखावयाच्या दर्जाबाबत मार्गदर्शक तत्त्वे विहित करणे;

(सहा) केंद्रे, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालये यांच्या कामांवर देखरेख करणे व त्यांचे संनियंत्रण करणे;

(सात) केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय ज्यांच्या मालकीचे आहे किंवा ज्या त्यांचे व्यवस्थापन करीत आहेत किंवा ते चालवीत आहेत अशा व्यक्तींसाठी आणि असे केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय यात कामावर नेमण्यात आलेल्या व्यक्तींसाठी एक आचारसंहिता तयार करणे;

(आठ) महिलांच्या बाबतीत प्रसवपूर्व अवस्थेपासूनच भेदभाव केला जाण्यात ज्याची परिणती होते अशा स्त्रीलिंगी भ्रूणहत्येच्या प्रथेविरुद्ध जनतेमध्ये जागृती निर्माण करणे;

(नऊ) सर्वसाधारणपणे अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे;

(दहा) राज्य शासन निदेश देईल अशी अन्य कार्यबाही करणे.

(२) समुचित प्राधिकरणास, या अधिनियमाखालील त्याची कामे पार पाडत असताना दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दाव्याची न्यायचौकशी करताना पुढील बाबतीत दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील.

(अ) शपथपत्राद्वारे वस्तुस्थितीचा पुरावा;

(ब) कोणत्याही व्यक्तीस समन्स पाठवून हजर राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर किंवा प्रतिज्ञेवर तपासणी करणे ;

(क) कागदपत्रे सादर करण्यास भाग पाडणे आणि ;

(ड) साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी राजादेश काढणे.

## प्रकरण चार

### केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय यांची नोंदणी

**प्रसवपूर्व निदान केंद्रे, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालये यांची नोंदणी.** ९. (१) या अधिनियमाच्या कलम ४, पोट-कलम (३) मध्ये निर्देश केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी अंशत: किंवा पूर्णत: प्रसवपूर्व निदान तंत्रांचा वापर करणारे प्रत्येक प्रजनन केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय, राज्य शासन, शासकीय राजपत्रात अधिसूचनेद्वारे याबाबत नियत करील अशा तारखेपासून साठ दिवसांच्या आत नोंदणीसाठी अर्ज करील. ती तारीख समुचित प्राधिकरणाची स्थापना करण्यात आल्याच्या तारखेच्या पूर्वीची तारीख नसेल. असे अर्ज विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने आणि अशा फीसह करण्यात येतील.

(२) कलम ५ च्या उपबंधाच्या अधीन राहून, पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या तारखेस कलम ४, पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनाकरिता प्रसवपूर्व निदान तंत्रांचा वापर करीत असलेले कोणतेही केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय हे, अशा तारखेपासून ६ महिन्यांच्या कालावधीच्या समाप्तीनंतर कोणत्याही प्रसवपूर्व निदान तंत्राचा वापर करण्याचे बंद करील. मात्र असे केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालयाने अगोदरच नोंदणीसाठी अर्ज केला असेल तर आणि या अधिनियमान्वये त्या तारखेपूर्वी अशा रीतीने त्याची नोंदणी झालेली असेल तर ते अशा तंत्रांचा वापर करण्याचे बंद करणार नाही.

(३) कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्या प्रारंभानंतर नवीन प्रजनन केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय यांची या अधिनियमाखाली रीतसर नोंदणी केल्याशिवाय ते सुरू करणार नाही.

**नोंदणी प्रमाणपत्र.** १०. (१) समुचित प्राधिकरण, आवश्यक असल्यास, चौकशी केल्यानंतर, आणि अर्जदाराने या अधिनियमाच्या व त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमांच्या आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता केलेली आहे अशी स्वत:ची खात्री पटल्यानंतर, यथास्थिति, केंद्रास, प्रयोगशाळेस किंवा चिकित्सालयास विहित नमुन्यातील एक नोंदणी प्रमाणपत्र देईल.

(२) अर्जदाराने अधिनियमाच्या आणि नियमांच्या आवश्यक बाबींची पूर्तता केलेली नसेल तर समुचित प्राधिकरण अर्जदारास अशी पूर्तता करण्यास बाजवी वेळ देऊ शकेल. चौकशी केल्यानंतर आणि अर्जदारास त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर समुचित प्राधिकरणाची अर्जदाराने

अशा आवश्यक बाबींची पूर्तता केलेली नाही अशी खात्री पटल्यास, ते, नाकारण्यासंबंधीची कारणे देऊन नोंदणीसाठी केलेला अर्ज नाकारील.

(३) प्रत्येक नोंदणी प्रमाणपत्राचे विहित करण्यात येईल, अशा रीतीने व अशा मुदतीनंतर आणि अशी फी दिल्यानंतर नवीकरण करण्यात येईल.

(४) नोंदणीकृत केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय त्याच्या कार्यालयात किंवा व्यवसायाच्या जागेत ठळक ठिकाणी नोंदणी प्रमाणपत्र लावील.

११. समुचित प्राधिकरणास स्वत: होऊन, किंवा राज्य दक्षता समितीकडून किंवा स्थानिक नोंदणी रद्द
दक्षता समितीकडून शिफारस मिळाल्यावर, केंद्रास, प्रयोगशाळेस किंवा चिकित्सालयास त्याची नोंदणी करणे
नोटिशीमध्ये नमूद केलेल्या कारणांसाठी निलंबित किंवा रद्द का करण्यात येऊ नये याची कारणे किंवा
दाखवण्यास फर्मावणारी नोटीस काढता येईल. किंवा ते तशी नोटीस काढील. केंद्रास, प्रयोगशाळेस किंवा निलंबित
चिकित्सालयास वाजवी संधी दिल्यानंतर, समुचित प्राधिकरणाची या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या करणे.
तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचा भंग झालेला आहे अशी खात्री पटल्यास, त्यास असे केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय यांच्याविरुद्ध ते जी कोणतीही फौजदारी कार्यवाही करील त्यास बाध न येऊ देता, तिची नोंदणी रद्द किंवा त्यास योग्य वाटेल त्या मुदतीकरता निलंबित, करता येईल.

१२. (१) ज्या केंद्राचा, प्रयोगशाळेचा किंवा चिकित्सालयाचा नोंदणीसाठीचा अर्ज समुचित अपिले.
प्राधिकरणाकडून फेटाळण्यात आला असेल किंवा ज्याच्याविरुद्ध नोंदणीच्या निलंबनाचा किंवा ती रद्द करण्याचा आदेश त्या प्राधिकरणाकडून काढण्यात आला असेल त्या केंद्रास, चिकित्सालयास किंवा प्रयोगशाळेस, आदेश मिळाल्याच्या तारखेपासून, तीस दिवसांच्या आत, विहित पद्धतीने राज्य शासनाकडे अपील दाखल करता येईल. अपिलासंबंधातील राज्य शासनाचा आदेश अंतिम असेल.

(२) नोंदणीच्या निलंबनाचा किंवा ती रद्द करण्याचा निदेश देणाऱ्या समुचित प्राधिकरणाच्या आदेशाविरुद्ध कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल किंवा असे दाखल करण्यात आलेले अपील राज्य शासनाकडून फेटाळण्यात आले असेल तर असे केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय यांमध्ये व्यवसाय करणाऱ्या ज्या वैद्यक व्यवसायीविरुद्ध असा आदेश काढण्यात आला असेल त्याच्याविरुद्ध योग्य कारवाई करण्यासाठी यथास्थिति, समुचित प्राधिकरण किंवा राज्य शासन यांच्या आदेशाची एक प्रत, समुचित प्राधिकरणाकडून महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे पाठविण्यात येईल.

## प्रकरण पाच

### दक्षता समित्या

१३. या अधिनियमास प्रारंभ झाल्यापासून, किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य राज्य दक्षता
शासन एका राज्य दक्षता समितीची नेमणूक करील. त्यामध्ये खालील व्यक्तींचा समावेश असेल :— समिती.

(एक) अध्यक्ष व निमंत्रक म्हणून निसमुचित प्राधिकरणाचा सचिव;
(दोन) स्वयंसेवी संघटनांचे दोन प्रतिनिधी;
(तीन) माहिती व जनसंपर्क महासंचालक किंवा त्याचा प्रतिनिधी
(चार) स्त्रीरोगतज्ज्ञ;
(पाच) वैद्यकीय प्रजननशास्त्रज्ञ;
(सहा) जिल्हा शल्यचिकित्सक किंवा मुख्य वैद्यकीय अधिकारी.

१४. राज्य दक्षता समितीची कार्ये पुढीलप्रमाणे असतील :— राज्य दक्षता
(अ) अधिनियम व नियम यांच्या तरतुदींच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी केंद्रे, समितीची
प्रयोगशाळा व चिकित्सालये यांना ठराविक कालावधीनंतर व अचानक भेटी देणे; कार्ये.

(ब) हा अधिनियम किंवा नियम यांच्या तरतुदींचे उल्लंघन करण्यात आले असल्यासंबंधातील लोकांच्या किंवा इतर संस्थांच्या किंवा वृत्तपत्र प्रतिनिधींच्या तक्रारींची चौकशी करणे;

(क) गुन्ह्याला पुष्टी देणारा पुरावा किंवा अभिलेख पुढील प्रशासकीय किंवा न्यायिक कार्यवाहीसाठी जप्त करणे;

(ड) केंद्राची, प्रयोगशाळेची किंवा चिकित्सालयाची नोंदणी रद्द करण्याविषयी किंवा अन्यथा किंवा त्यांच्याविरुद्ध खटला दाखल करण्याविषयी समुचित प्राधिकरणाकडे शिफारस करणे;

(ई) अनधिकृत केंद्रे, चिकित्सालये किंवा प्रयोगशाळा चालवण्यास आळा घालणे व त्यास प्रतिबंध करणे;

(फ) समुचित प्राधिकरण किंवा राज्य शासन निदेश देईल अशी अन्य कोणतीही कार्यवाही करणे.

राज्य दक्षता समितीची बैठक.

१५. (१) राज्य दक्षता समिती तिच्यासमोर ठेवण्यात येईल असे कामकाज चालविण्यासाठी आवश्यक असेल तशी व तेव्हा बैठक आयोजित करील. समितीला आपले कामकाज चालविण्यासाठी नियम तयार करण्याचे अधिकार असतील.

(२) राज्य दक्षता समितीच्या बैठकीतील सर्व निर्णय त्या बैठकीला उपस्थित असलेल्या सदस्यांच्या साध्या बहुमताने घेतले जातील. बैठकीसाठी अध्यक्ष धरून चार सदस्यांची उपस्थिती गणपूर्तीसाठी आवश्यक असेल.

(३) राज्य दक्षता समितीचे निर्णय किंवा कोणतीही कार्यवाही, एखाद्या सदस्याचे पद रिक्त आहे किंवा तो अनुपस्थित आहे केवळ याच कारणावरून निष्फळ ठरणार नाहीत किंवा विधिअग्राह्य मानण्यात येणार नाहीत.

स्थानिक दक्षता समिती.

१६. (१) समुचित प्राधिकरण विनिर्दिष्ट करील अशा स्थानिक क्षेत्राकरिता स्थानिक दक्षता समिती असेल. स्थानिक दक्षता समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश करता येईल :—

(एक) त्या विभागाचे आरोग्य सेवा उप संचालक— पदसिद्ध अध्यक्ष व निमंत्रक;

(दोन) संबंधित जिल्ह्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी;

(तीन) स्थानिक क्षेत्राचे जिल्हा शल्यचिकित्सक किंवा मुख्य वैद्यकीय अधिकारी;

(चार) जिल्हाधिकाऱ्याने नामनिर्देशित केलेला व कार्यकारी दंडाधिकाऱ्याचे अधिकार असलेला, तहसिलदाराच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेला कोणताही अधिकारी;

(पाच) स्त्रीरोगतज्ज्ञ;

(सहा) वैद्यकीय प्रजननशास्त्रज्ञ;

(सात) महिला संघटनांचा प्रतिनिधी;

(आठ) इतर कोणत्याही स्वेच्छा संघटनांचा प्रतिनिधी.

(२) स्थानिक दक्षता समितीचे अशासकीय सदस्य समुचित प्राधिकरणाकडून नामनिर्देशित करण्यात येतील.

स्थानिक दक्षता समितीच्या बैठकी व कार्ये.

१७. (१) स्थानिक दक्षता समितीच्या बैठकीमधील सर्व निर्णय हे, त्या बैठकीला उपस्थित असलेल्या सदस्यांच्या साध्या बहुमताने घेतले जातील. बैठकीसाठी अध्यक्ष धरून एकूण चार सदस्यांची उपस्थिती गणपूर्तीसाठी आवश्यक असेल.

(२) स्थानिक दक्षता समितीचा कोणताही निर्णय व कोणतीही कार्यवाही केवळ एखाद्या सदस्याचे पद रिक्त आहे किंवा तो अनुपस्थित आहे, या कारणावरून निष्फळ ठरणार नाही किंवा तो विधिअग्राह्य मानण्यात येणार नाही.

(३) स्थानिक दक्षता समितीने घेतलेले सर्व निर्णय आणि केलेल्या कार्यवाह्या, ती समिती राज्य दक्षता समितीला, विहित करण्यात येईल अशा रीतीने व तेवढ्या कालांतराने कळवील.

(४) स्थानिक दक्षता समितीची कामे व अधिकार हे, राज्य दक्षता समितीसारखेच असतील व ती त्यांचा वापर स्थानिक क्षेत्रांमध्येच करील.

१८. (१) राज्य दक्षता समिती व स्थानिक दक्षता समिती यांच्या अशासकीय सदस्यांची नियुक्ती तीन वर्षांच्या कालावधीकरिता केली जाईल आणि नियुक्तीचा कालावधी समाप्त झाल्यावर ते पुर्ननियुक्तीसाठी पात्र असतील. अशासकीय सदस्यांचा नियुक्तीचा कालावधी व त्यांचे भत्ते.

(२) या समित्यांच्या अशासकीय सदस्यांना राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील अशा दराने प्रवासभत्ता, बैठक भत्ता व इतर भत्ते मिळण्याचा हक्क असेल.

## प्रकरण सहा

### अपराध व शास्ती

१९. (१) ज्याच्या मालकीचे एखादे केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय आहे किंवा जो अशा केंद्रात, प्रयोगशाळेत किंवा चिकित्सालयात नोकरीला आहे किंवा ज्याने अशा केंद्राला, प्रयोगशाळेला किंवा चिकित्सालयाला किंवा त्यामध्ये आपल्या सेवा, मानसेवी तत्वावर किंवा अन्य प्रकारे दिलेल्या आहेत, आणि ज्याने या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे असा कोणताही वैद्यकीय प्रजननशास्त्रज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी किंवा कोणतीही व्यक्ती, दोषसिद्धी झाल्यानंतर, तीन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कालावधीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडास पात्र ठरेल : अपराध व शास्ती.

परंतु, प्रत्येक दोषसिद्धीच्या बाबतीत शिक्षेचा कालावधी एक वर्षापेक्षा कमी असणार नाही आणि दंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही :

आणखी असे की, न्यायालयाने दोषी ठरवलेल्या स्त्रीरोगतज्ञाचे किंवा नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीचे नाव, त्याच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यासाठी, तसेच परिषदेच्या नोंदवहीतून त्याचे नाव पहिल्या अपराधाकरिता दोन वर्षांच्या कालावधीसाठी आणि त्यानंतरच्या अपराधाकरिता कायमचे काढून टाकण्यासाठी महाराष्ट्र वैद्यक परिषदेला समुचित प्राधिकरणाकडून कळवण्यात येईल.

(२) जी व्यक्ती, कलम ४, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनार्थ गर्भवती स्त्रीवर प्रसवपूर्व निदान तंत्रांचा वापर करण्यासाठी, एखाद्या केंद्राची किंवा प्रयोगशाळेची किंवा चिकित्सालयाची किंवा एखाद्या वैद्यकीय प्रजननशास्त्रज्ञाची किंवा स्त्रीरोगतज्ञाची किंवा वैद्यक व्यवसायीची मदत घेईल, ती, दोषसिद्धीनंतर, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस आणि तीन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल :

परंतु, या पोट-कलमाखालील प्रत्येक दोषसिद्धीच्या बाबतीत शिक्षेचा कालावधी एक वर्षापेक्षा कमी असणार नाही आणि दंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही :

आणखी असे की, एखाद्या स्त्रीने प्रसवपूर्व लिंगनिदानासाठी स्वतः होऊन अशी मदत घेतल्यास, न्यायालय, अन्यथा सिद्ध झाले नसल्यास, नेहमी असे गृहीत धरील की, तिला असे करण्याची तिच्या पतीने किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्तींनी सक्ती केलेली आहे, आणि अशी व्यक्ती, दोषसिद्धीनंतर या पोट-कलमाखालील अपराधास अपप्रेरणा दिल्याबद्दल तेवढ्याच शिक्षेस पात्र ठरेल आणि त्या प्रकरणी, ती स्त्री अशा प्रत्येक अपराधाबद्दल पन्नास रुपये एवढा दंड भरण्यास पात्र ठरेल.

(३) जो कोणी, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा त्या अन्वये केलेल्या कोणत्याही नियमांचे किंवा दिलेल्या कोणत्याही निदेशाचे उल्लंघन करील व त्यासाठी या अधिनियमात अन्यत्र कोठेही कोणत्याही शास्तीची तरतूद केलेली नसेल, त्या व्यक्तीस, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील, आणि अशा

पहिल्या उल्लंघनाबद्दल दोषसिद्धी झाल्यानंतर असे उल्लंघन करणे चालू राहिले तर, असे उल्लंघन करणे जेवढे दिवस चालू राहील त्या प्रत्येक दिवसाकरिता पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या जादा दंडाची शिक्षा होईल.

अपराध दखलपात्र असणे इत्यादी. २०. कलम १९, पोट-कलम (२) किंवा (३) अन्वये शिक्षापात्र असणारा प्रत्येक अपराध दखलपात्र, बिनजमानती आणि आपसात न मिटविण्याजोगा असेल.

न्यायालयाचे अधिकार. २१. (१) कोणतेही न्यायालय,—

(अ) समुचित प्राधिकरण, राज्य किंवा स्थानिक दक्षता समिती किंवा राज्य शासन, समुचित प्राधिकरण किंवा राज्य वा स्थानिक दक्षता समिती यांच्याकडून याबाबत प्राधिकृत करण्यात आलेला कोणताही अधिकारी ;

(ब) जिने समुचित प्राधिकरण, कोणतीही दक्षता समिती किंवा पूर्वोक्ताप्रमाणे प्राधिकृत केलेला अधिकारी यांच्याकडे, विहित केलेल्या रीतीने, अभिकथित अपराधाबाबत आणि न्यायालयाकडे तक्रार करण्याच्या आपल्या उद्देशाबाबत साठ दिवसांपेक्षा कमी नाही इतक्या दिवसांची नोटीस दिली आहे अशी कोणतीही व्यक्ती,

यांच्याकडून आलेल्या तक्रारीशिवाय अन्य तक्रारीखालील अपराधांची या अधिनियमान्वये दखल घेणार नाही :

आणि प्रथम वर्ग महानगर दंडाधिकारी किंवा न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयास दुय्यम असलेले कोणतेही न्यायालय, या अधिनियमान्वये कोणत्याही शिक्षापात्र अपराधाची न्यायचौकशी करू शकणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (ब) अन्वये तक्रार करण्यात आल्यानंतर, न्यायालय, अशा व्यक्तीच्या मागणीवरून, प्राधिकरण किंवा दक्षता समिती यांच्या ताब्यातील संबंधित अभिलेख, त्या व्यक्तीला उपलब्ध करून देण्याविषयी आदेश देऊ शकेल :

परंतु, प्राधिकरण किंवा समिती यांच्या मते, जर ही गोष्ट लोकहिताला बाधक ठरत असेल तर, त्यांना असा कोणताही अभिलेख अशा व्यक्तीला उपलब्ध करून देण्यास नकार देता येईल.

(३) न्यायालयास, न्यायनिर्णयामध्ये नमूद करावयाच्या पुरेशा आणि विशेष कारणांकरिता, या अधिनियमान्वये लादता येणे शक्य असलेल्या शिक्षेपेक्षा कमी असलेली शिक्षा लादता येईल.

## प्रकरण सात

### संकीर्ण

अभिलेख ठेवणे. २२. (१) या अधिनियमान्वये व नियमान्वये ठेवणे आवश्यक असलेले सर्व अभिलेख, तक्ते, नमुने, अहवाल, संमतिपत्रे व इतर सर्व दस्तऐवज दोन वर्षांच्या कालावधीकरिता किंवा विहित करण्यात येईल एवढ्या कालावधीकरिता जतन करून ठेवण्यात येतील :

परंतु, एखाद्या केंद्राच्या, प्रयोगशाळेच्या किंवा चिकित्सालयाच्या विरुद्ध कोणताही फौजदारी वा अन्य खटला दाखल करण्यात आलेला असेल तर, अशा केंद्राचे, चिकित्सालयाचे किंवा प्रयोगशाळेचे अभिलेख व इतर सर्व दस्तऐवज, असा खटला अंतिम रीत्या निकालात निघेपर्यंत जतन करून ठेवण्यात येतील.

(२) असे सर्व अभिलेख, समुचित प्राधिकरणाच्या सदस्यांना किंवा, राज्य किंवा स्थानिक दक्षता समितीच्या सदस्यांना किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीला तपासणीसाठी सर्व वाजवी वेळी उपलब्ध होऊ शकतील.

अभिलेख जप्त करण्याचे अधिकार. २३. (१) एखाद्या केंद्रामध्ये, प्रयोगशाळेत किंवा चिकित्सालयात, या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करण्यात आले आहे, किंवा लिंग निदानासाठी कोणत्याही प्रसवपूर्व निदान पद्धतींचा किंवा तंत्रांचा वापर करण्यात आला आहे, असे जर समुचित प्राधिकरणाला किंवा राज्य

१३९

किंवा स्थानिक दक्षता समितीला सकारण वाटत असेल तर राज्य अथवा स्थानिक दक्षता समितीच्या अध्यक्षाला किंवा राज्य शासनाने किंवा प्राधिकरणाने किंवा समितीने रीतसर प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही सदस्याला अशा कद्राच्या, प्रयोगशाळेच्या किंवा चिकित्सालयाच्या जागेची झडती घेण्याचे आणि आवश्यक असतील असे अभिलेख व दस्तऐवज, त्याबाबत पावती देऊन जप्त करण्याचे अधिकार असतील, आणि अशा रीतीने जप्त करण्यात आलेले अभिलेख व दस्तऐवज, या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीसंबंधात किंवा खटल्यासंबंधात आवश्यक असेल तेवढ्या कालावधीकरिता प्राधिकरण किंवा समिती आपल्याजवळ ठेवून घेईल.

१९७४ चा २. (२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या तरतुदी, पोट-कलम (१) खाली केल्या जाणाऱ्या कार्यवाहीला लागू होतील, आणि अशी कार्यवाही करणारी व्यक्ती; आवश्यकता भासेल तेव्हा जवळच्या पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्याचे सहाय्य घेईल.

**सद्‌भावनेने केलेल्या कृत्यास संरक्षण.**

२४. या अधिनियमान्वये सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही गोष्टी-करिता, राज्य शासन समुचित प्राधिकरण, राज्य किंवा स्थानिक दक्षता समिती किंवा त्यांच्या प्राधिकाराखाली काम करणारी कोणतीही व्यक्ती, यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

**सूट.**

२५. अशी सूट देणे हे लोकहिताच्या दृष्टीने योग्य आहे अशी शिफारस समुचित प्राधिकरणाने केल्यावर राज्य शासनाला, त्याने किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने चालवलेले प्रजनन केंद्र प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय यांना या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा सर्व तरतुदींमधून सूट देता येईल :

परंतु प्रजनन केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय येथील व्यक्तींच्या किमान अर्हता, तेथे आवश्यक असलेली किमान साधनसामग्री, तेथे राखावयाचा दर्जा आणि तेथे काम करणाऱ्या व्यक्तींची आचारसंहिता यासंबंधात अशी सूट देता येणार नाही.

**नियम करण्याचे अधिकार.**

२६. (१) राज्य शासनास, शासकीय राजपत्रात आधी प्रसिद्ध करण्याच्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता नियम तयार करता येतील :

परंतु, तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल राज्य शासनाची खात्री झाली असल्यास त्यास या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या बाबतीत तो आधी प्रसिद्ध करण्याची शर्त काढून टाकता येईल.

(२) विशेषेकरून, आणि पूर्ववर्ती अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता अशा नियमां-मध्ये पुढील गोष्टींसाठी तरतूद करता येईल :—

(एक) नोंदणीकृत केंद्र किंवा प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय यांमध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या किमान अर्हता;

(दोन) नोंदणीसाठी अर्ज करण्याचा नमुना व पद्धती, ठेवावयाचे अभिलेख, नोंदणीकृत केंद्र किंवा प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय यांमध्ये, स्त्रीरुग्णांनी द्यावयाचे संमतिपत्र;

(तीन) केंद्र किंवा प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय येथे आवश्यक असलेली किमान साधन सामग्री;

(चार) केंद्र किंवा प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय यांनी कायम ठेवावयाचा दर्जा;

(पाच) केंद्र किंवा प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय यामध्ये काम करणाऱ्या व्यक्तींची आचार संहिता;

(सहा) नोंदणीस नकार देणे, ती रद्द करणे किंवा ती निलंबित करणे यासंबंधीच्या आदेशा-विरुद्ध राज्य शासनाकडे करण्यात यावयाच्या अपीलाबाबतची पद्धती;

(सात) नोंदणीच्या वैधतेचा कालावधी, नोंदणीच्या नूतनीकरणाची कार्यपद्धती आणि नोंदणी आणि तिचे नूतनीकरण यासाठी आकारावयाची फी;

(आठ) ज्या पद्धतीने आणि ज्या कालांतराने स्थानिक दक्षता समिती, तिचे निर्णय व कार्यवाही याबाबत राज्य दक्षता समितीला कळवील ती पद्धती व ती कालांतरे;

(नऊ) केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय यामध्ये ठेवावयाचे अभिलेख, तक्ते, अहवाल आणि इतर कागदपत्रे आणि असे अभिलेख व कागदपत्रे ज्या मुदतीपर्यंत ठेवावयाची व जतन करावयाची ती मुदत ; आणि

(दहा) या अधिनियमान्वये आवश्यक असलेली किंवा विहित करण्यात येईल अशी कोणतीही इतर बाब.

(३) ह्या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधान-मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधि-सूचनेच्या तारखेपासून यथास्थिती अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येईल किंवा येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यांमुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

(यथार्थ अनुवाद)

प. ग. पाटील,
भाषा संचालय, महाराष्ट्र राज्य.